# ज.ए.इ.ची पूर्व प्राथमिक शाळा (सुभेदारवाडा) कल्याण (प.)

## वार्षिक अहवाल डिसेंबर २०१५ - डिसेंबर २०१६

सस्नेह नमस्कार !

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व - प्राथमिक शाळा, सुभेदारवाडा, गांधीचौक, कल्याण (प.) आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

* नोव्हेंबर १९८४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व-प्राथमिक शाळा कल्याणमधील सुभेदारवाड्यात सुरु झाली. सध्या शाळेच्या पूर्व-प्राथमिक विभागात मोठा शिशु वर्गाचे ४ वर्ग छोटाशिशु वर्गाचे ४ वर्ग, नर्सरीचे २ वर्ग आणि प्लेग्रुपचा १ वर्ग असून ४४३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत १ मुख्याध्यापिका, आठ शिक्षिका, एक संगीत शिक्षिका, १ लिपिक सहा सेविका, दोन हंगामी शिक्षिका व १ हंगामी सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.
* शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. उदा. आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची दिंडी, दीपपूजा, रक्षाबंधन, बैलपोळा, नागपंचमी, दहीहंडी, संक्रांत (तिळगूळ समारंभ), शेकोटी, भोंडला, शारदोत्सव (दसरा), रंगपंचमी होळी इत्यादी दर चार महिन्यांनी विद्यार्थ्यांचे वाढदिवस होमहवन करुन 'गायत्रीमंत्र' म्हणून साजरे केले जातात.
* जुलै महिन्यापासून दर बुधवारी विद्यार्थ्यांना पौष्टीक खाऊ दिला जातो.
* २०१५ रोजी चिन्मय मिशन गीता पठण स्पर्धेत कु. चैत्राली भूषण जठार हिला पारितोषिक मिळाले तसेच २०१६ रोजी झालेल्या गीता पठण स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी प्रथम फेरीत यश संपादन केले आहे.

  १) कु. शर्वरी येवले, २) कु. तन्मय येवले

  ३) कु. हर्षा मोरे ४) कु. मितेज जाधव
* अथर्व ट्रस्ट डोंबिवली तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले.

  १) कु. श्रावणी पांचाळ - कलाविष्कार

  २) कु. तेजश्री मोरे - कलाविष्कार
* जायंटस् ग्रुप ऑफ कल्याण मेट्रोतर्फे तीन चाकी सायकल स्पर्धा रविवार दि. १४ फेब्रुवारी २०१६ रोजी म्हसोबा मैदान येथे घेण्यात आली. पुढील विद्यार्थ्याला प्रमाणपत्र ट्रॉफी व स्माइली कप मिळाला.

  द्वितीय क्रमांक : कु. खोमणे आरुश गणेश
* अचिव्हर्स हाय पब्लिक स्कूल यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

  प्रथम क्रमांक - कु. स्वराज चौधरी (सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र)

उत्तेजनार्थ १) कु. निलाक्षी जानवे, २) कु. ऐश्वर्यालक्ष्मी पाटील - प्रमाणपत्र.

* नवनीत तर्फे घेण्यात आलेल्या मास्टर स्ट्रोक या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

| | |
|---|---|
| १) कु. देवरे गौरव वालमीक | २) कु. येवले शर्वरी योगेश |
| ३) कु. अरुणीवतीकर देवश्री शेखर | ४) कु. भंडारी आर्यन भालचंद्र |
| ५) कु. फडके देवेश संजय | ६) कु. चोरघे रिचा दिनेश |
| ७) कु. शिंदे अक्षरा गणेश | ८) कु. धामणकर दिप्ती संदीप |

* कॅमलिन चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.
* ज.ए.इ. चे. हायस्कूल व ज्यु. कॉलेज सुभेदारवाडा कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. श्री. जयंत जोशी यांचे 'शुन्य कचरा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.
* शनिवार दि. २३ जानेवारी २०१६ रोजी मराठी-इंग्रजी माध्यमाचे स्नेहसंमेलन आचार्य अत्रे रंगमंदिर येथे साजरे झाले.

  विषय - नात्यांमधील प्रेम

  पाहुणे - मा. सौ. शालिनीताई वायले.

  अध्यक्ष - मा. श्री. जे. एन. पाटील (ज.ए.इ. चे संचालक मंडळ सदस्य)
* दरवर्षीप्रमाणे छोटा, मोठा, इंग्रजी माध्यमाची सहल बिर्ला मंदिर, शहाड येथे शुक्रवार दि. २९ जानेवारी रोजी नेण्यात आली.
* नर्सरीची सहल अक्षत गणपती येथे शाळेच्या वेळेत नेण्यात आली.
* शनिवार दि. ३० जानेवारी रोजी पालक-शिक्षक संघातर्फे घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेचा बक्षिस समारंभ (बालवाडी ते इयत्ता ४ थी पर्यंत) करण्यात आला.

  पाहुणे - कु. वल्लरी धोंडे (पॉवर लिफ्टींग)

  अध्यक्ष- मा. श्री. राधाकृष्ण पाठक (संचालक मंडळ सदस्य व प्राथमिक विभाग शालेय समिती अध्यक्ष)
* जागतिक आरोग्य संघटनेतर्फे बुधवार दि. २४ फेब्रुवारी रोजी श्री. विशाल दुधावडे यांचे मार्गदर्शन होते.
* बुधवार दि. १९/०३/१६ ते गुरुवार दि. ७/४/१६ पर्यंत छोटा शिशु व मोठा शिशु विद्यार्थ्यांची तोंडी व लेखी वार्षिक परीक्षा घेण्यात आली.
* सोमवार दि. ८/८/१६ ते शनिवार दि. १३/८/१६ रोजी सर्व शिक्षक-शिक्षकेतरांसह विद्यार्थ्यांसमोर दृश्यस्वरुपात गोष्टींचा आठवडा सादर केला.
* मंगळवार दि. २ ऑगस्ट रोजी दीपअमवस्येनिमित्त निरनिराळ्या दिव्यांची मांडणी करुन 'अष्टविनायक' देखावा उभा करण्यात आला होता.
* गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मोठा शिशुच्या विद्यार्थ्यांच्या बालसभेचे आयोजन करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांनीच साजरा केला.

* गुरुवार दि. २९ जुलै रोजी 'मनशक्ती केंद्र' तळेगाव येथून आलेल्या १) मा. डॉ. वसुधा पवार, २) मा. श्री. अहिरराव सर यांचे 'मेंदूक्रांती' कार्यशाळा या विषयावर पालकांसाठी मार्गदर्शन होते.
* १ ऑगस्ट टिळक पुण्यतिथी निमित्त स्पर्धा घेण्यात आल्या. प्लेग्रुप स्पर्धा-रांगत जाणे. प्रथम क्रमांक - कु. हेगिष्टे पार्थ दिनेश, नर्सरी स्पर्धा-गोलात उडी मारत जाणे (सकाळसत्र) प्रथम क्रमांक-कु. भोईर उत्कर्ष किरण, (दुपारसत्र) प्रथम क्रमांक-कु. नरवाडे रोशन दिलीप.

  छोटा शिशु स्पर्धा- बेडूक उड्या मारणे.

  प्रथम क्रमांक - कु. पाटील आयुष ज्ञानेश्वर, द्वितीय क्रमांक - कु. सदाकाळ यश कैलास, तृतीय क्रमांक -कु. पाटील प्रथमेश संजीव. उत्तेजनार्थ-कु. भताणे कार्तिक विठ्ठल.

  मोठा शिशु स्पर्धा - मनोरा लावणे.

  प्रथम क्रमंक -कु. शिंपी देवेन महेश, द्वितीय क्रमांक - कु. पाटील प्रथमेश देवेंद्र, तृतीय क्रमांक - कु. पाटील श्रद्धा महेंद्र. उत्तेजनार्थ - कु. शिरसाठ हर्षल किशोर.
* ज.ए.इ.ची पूर्व प्राथमिक शाळा ठाणे ह्या शाळेतून १) सौ. मंदा शांताराम गुरव, २) सौ. सायली संजय पवार या दोन सेविका ३ ऑगस्ट २०१६ रोजी ह्या आपल्या शाळेत बदली होऊन आल्या.
* मातृदिनानिमित्त पूर्व -प्राथमिक विभागाच्या महिला पालकांची कागदी ग्लासांचा मनोरा लावणे ही क्रीडा स्पर्धा ३१ ऑगस्ट रोजी घेण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षण १) श्री. राजेंद्र नागे (पालक-शिक्षक संघ पूर्व-प्राथमिक विभाग उपकार्यवाह), २) श्री. सुशील शिरोडकर ह्यांनी केले. पुढील महिला पालकांना पारितोषिक मिळाले. प्रथम क्रमांक :- सौ. कारभारी ज्योती सुभाष, द्वितीय क्रमांक-सौ. कोळसे संपदा तेजस, तृतीय क्रमांक :- सौ. काकड सुनीता अरविंद, तसेच महिला पालकांसाठी कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कथाकथनासाठी-सौ. वीणा गोगटे (शारदा मंदिर हायस्कूलच्या शिक्षिका) ह्या पाहुण्या आल्या होत्या.
* दरवर्षीप्रमणे याही वर्षी दहीहंडीचा कार्यक्रमाचा खर्च आपल्या शाळेतील माजी सेविका श्रीमती मुक्ता नाथा काकरे यांनी केला. नर्सरीच्या वर्गात १ सप्टेंबर रोजी मातृदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पूजन केले.
* २ सप्टेंबर रोजी गणपती बाप्पाचे आगमन झाले. गणपतीची मिरवणूक शाळेच्या आवारातून काढली होती. प्रसादाचा खर्च सौ. नीता रामतीर्थ (सहाय्यक शिक्षिका) आणि सर्व सेविकांनी केला.
* १२ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे शिक्षकांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

  स्पर्धा - आगपेटीच्या एका काडीने जास्तीत जास्त मेणबत्त्या लावणे.

पुढील शिक्षकांना पारितोषिक मिळाले.
प्रथम क्रमांक - सौ. विद्या राजेश राणे.
द्वितीय क्रमांक - सौ. निलिमा नरेश भाभे
तृतीय क्रमांक - सौ. सुनीता लक्ष्मण निकम
इंग्रजी माध्यम :- प्रथम क्रमांक - सौ. पुनम आतिष वडनेरे.

* महिला उत्कर्ष मंडळ यांच्या सहयोगाने कलांगण आयोजित लिंबू-टिंबू बालगीत स्पर्धा २०१६ स्पर्धेत विद्यार्थ्यांनीसह घेतला होता. त्यात कु. आद्रा लिंगायत ह्या विद्यार्थीनीची अंतिम फेरीसाठी निवड झाली.
* जंगली प्राणी-पाळीव प्राणी हा उपक्रम शैक्षणिक साहित्यांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखविला.
* दि. १ ऑक्टोबर रोजी ज.ए.इ.ची पूर्व-प्राथमिक शाळा, कुर्ला, ह्या शाळेतून सौ. विजया विजय सावंत ह्या सेविका आपल्या शाळेत बदली होऊन आल्या.
* दरवर्षीप्रमाणे शारदोत्सव पाच दिवस साजरा करण्यात आला. यात देवीची स्थापना, मुलींचा भोंडला, विद्यार्थ्यांचा कुलागुणदर्शनाचा कार्यक्रम, महिला पालकांचा भोंडला तसेच दसऱ्याच्या दिवशी पाटीपूजन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले होते.
* विशेष बाब :- आमणेपाडा या गावात जाऊन तेथील महिलांना मुलांचे आरोग्य, महिलांचे आरोग्य, शिक्षण या संबंधी माहिती दिली. त्यांच्याशी संवाद साधला.
* छोटा शिशु व मोठा शिशुची सहामाही तोंडी व लेखी परीक्षा सोमवार दि. १७/१०/१६ ते शनिवार दि. २२/१०/१६ या कालावधीत घेण्यात आली.
* बुधवार दि. २३ नोव्हेंबर रोजी बालदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या बालमहोत्सवात 'जल्लोष' ही कार्यशाळा आयोजित केली होती. त्यात गोष्ट, गाणी, नाच, खेळ, कोलाजकाम, मातीकाम, क्राफ्ट असे वेगवेगळे कार्यक्रम घेतले.
* शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतकांनी संस्थेकडे काही ठेवी ठेवलेल्या आहेत. त्यातूनच लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त घेण्यात येणाऱ्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येतात. तसेच कु. तनिष्क किशोर सारंग ह्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी वाढदिवसानिमित्त श्री. किशोर सारंग ह्यांनी शाळेला घड्याळ भेट दिले. शाळेसाठी श्री गणपतीची मूर्ती सहाय्यक शिक्षिका सौ. विद्या राजेश राणे यांनी दिली. अशाप्रकारे विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत आहेत. त्यास यश मिळावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

धन्यवाद!

**सौ. रसिका यशवंत जांभुळकर**
मुख्याध्यापिका
ज.ए.इ.ची. पूर्व प्राथमिक शाळा
कल्याण (प.)

संकलन : - सौ. निलिमा नरेश भाभे (सहाय्यक शिक्षिका)